:: प्रेस नोट ::

दिनांक 21/02/2020 रोजी रात्रौ 21.00 वा. चे सुमारास श्री.मनोहर सखाराम ढेकणे हे आठवडा बाजार रत्नागिरी येथील नॅशनल मोबाईल शॉपी बंद करून मोटारसायकलने त्यांचे रहाते घरी रामलक्ष्मी नारायण अपार्टमेंट, बंदररोड रत्नागिरी येथे गेले त्या ठिकाणी ते त्यांची मोटारसायकल पार्क करुन आपले प्लॅटमध्ये जात असताना एक चारचाकी गाडीतून सराईत गुन्हेगार सचिन जुमनाळकर व त्याचे सोबत असलेला एक अनोळखी इसम असे येवून त्यांनी मनोहर ढेकणे यांचेकडे चाकूचा धाक दाखवून 50 हजार रु.ची खंडणी मागितली. सदरची रक्कम त्यांनी देण्यास नकार दिल्याने सचिन जुमनाळकर याने पँटचे खिशातून रिव्हॉल्वर काढून त्यांना जीवे ठार मारण्याचे हेतूने त्यांचेवर एक राऊंड फायर केला व ते दोन्ही इसम पळून गेले. सदर फायरींगमध्ये मनोहर ढेकणे हे गंभीर जखमी झाले. त्यांना औषधोपचाराकरीता तेथील नागरीकांनी तात्काळ जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे दाखल केलेले होते. सदर घटनेवरुन रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. 61/2020 भादवि कलम 307,386,397,75,34 सह भारतीय हत्यार अधिनियम कलम 3/25,27 प्रमाणे गुन्हा दाखल केलेला होता.

सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने तात्काळ पोलीस अधीक्षक डॉ.प्रविण मुंढे, अपर पोलीस अधीक्षक श्री.विशाल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.गणेश इंगळे यांनी घटनास्थळी भेट देवून पहाणी केली व सदर गुन्हयातील आरोपीत यांचे शोधाकरीता पोनि श्री.शिरीष सासने, पोनि श्री.अनिल लाड, पोनि श्री.सुरेश कदम यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, रत्नागिरी शहर पोलीस स्टेशन, रत्नागिरी ग्रामीण पोलीस स्टेशनकडील स्वतंत्र तपास पथके निर्माण करून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

सचिन जुमनाळकर हा सराइत गुन्हेगार असून त्याचे विरुध्द यापुर्वी खून, खंडणीसारखे गुन्हे दाखल आहेत. सध्या तो रत्नागिरी शहर पोलीस स्टेशनकडील गुन्हा रजि.नं. 19/2007 भादवि 302 या खूनाचे गुन्हयामध्ये कळंबा कारागृह कोल्हापूर येथे दिनांक 06/12/2008 पासून जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. सदर शिक्षेदरम्यान त्याने संचित रजा मिळणेकामी विनंती केलेली होती. परंतु पोलीस निरीक्षक मंद्रुप पोलीस ठाणे जिल्हा सोलापूर यांनी सचिन जुमनाळकर यास संचित रजा मंजुर करु नये असा अहवाल दिलेला होता. परंतु सचिन जुमनाळकर याने संचित रजेबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिटपिटीशन दाखल केल्याने त्यामध्ये त्यास 28 दिवसांची संचित रजा मंजुर झालेली होती. माहे सन 2019 मध्ये सचिन जुमनाळकर हा 28 दिवसाचे संचित रजेवर कारागृहातून बाहेर आलेला होता. तो दिनांक 26/11/2019 रोजी कारागृहात हजर होणे आवश्यक होते परंतु तो कारागृहात हजर न होता फरार झालेला होता. त्याबाबत मंद्रुप पो.ठाणे जिल्हा सोलापूर येथे गुन्हा रजि.नं.293/2019 भादवि 224 प्रमाणे दाखल आहे.

सचिन जुमनाळकर याचेबाबत सविस्तर माहीती प्राप्त करून तो ज्या ठिकाणी जावू शकतो त्या त्या ठिकाणी स्वतंत्र तपासपथके पाठविण्यात आली. त्याप्रमाणे कर्नाटक राज्यामध्ये विजापूर येथे स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील एक पथक रवाना झालेले होते. विजापूर नजीक असलेल्या होरती गावामध्ये सचिन जुमनाळकर असल्याबाबत गोपनीय माहीती उपलब्ध झाली. त्या आधारे सदर गावाचे बाहेर येणा-या रोडवर तपास पथकातील कर्मचारी यांनी त्याचेवर पाळत ठेवली. त्या दरम्यान गावातून येणा-या रस्त्याने 3 इसम एका पल्सर मोटारसायकलवरुन येताना दिसले. सदर पथकातील पोलीस कर्मचारी हे सचिन जुमनाळकर यास ओळखत असल्याने त्यास ओळखले. परंतु सचिन

जुमनाळकर याने आपले मागावर पोलीस आल्याचे पाहताच ते त्या ठिकाणावरुन पळून जावू लागले. सदर पथकाने त्यांचा पाठलाग करून त्यांना काही अंतरावर ताब्यात घेतले.

सचिन भिमराव जुमनाळकर वय 42 मुळ रा.बेलबाग रत्नागिरी याचे सोबत असलेले अन्य इसमांबाबत सचिन जुमनाळकर याचेकडे माहीती घेता, त्यातील मनोहर हनुमंत चलवादी वय 42 रा.जुमनाळ, ता.जि.विजापूर हा व सिध्दाराम नामदेव कांबळे वय 28 रा.तेलगाव ता.जि.दक्षिण सोलापूर हे दोघे घटने दरम्यान आपले सोबत असल्याचे सांगितले. त्यातील मनोहर चलवादी हा फायरींग दरम्यान सोबत होता व सिध्दाराम कांबळे हा गाडीमध्ये बसलेला होता. मनोहर चलवादी हा सचिन जुमनाळकर याचा पुतण्या असून सिध्दाराम कांबळे हा मेहुणा आहे. त्यांचेकडून गुन्हयात वापरलेला चॉपर व स्वीप्ट डिझायर गाडी क्रमांक के.ए.02-एम.एफ.-0491 तसेच मोबाईल हँडसेट असे जप्त करण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी ही डॉ.प्रविण मुंढे पोलीस अधीक्षक, श्री.विशाल गायकवाड अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री.शिरीष सासने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, पोलीस उपनिरीक्षक श्री.विकास चव्हाण, सहा.पोलीस उपनिरीक्षक श्री.सुभाष माने, पोहेकॉ संदीप कोळंबेकर, नितीन डोमणे, विजय आंबेकर, उत्तम सासवे, दत्ता कांबळे यांनी केलेली आहे.